महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:-डब्ल्यूईबी-१०२०/सीआर-२६/२०२१/मा.तं. दिनांक:- १५ फेब्रुवारी, २०२२

## -: प्रसिध्दीपत्रक:-

**विषय:- महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०१९ - पदांचे पसंतीक्रम व भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याच्या सुविधेसंदर्भात**

**संदर्भ:- (१) जाहिरात/अधिसूचना क्रमांक १७/२०१९, दिनांक ३० सप्टेंबर, २०१९**
**(२) आयोगाचे दिनांक १२ फेब्रुवारी, २०२२ रोजीचे प्रसिध्दीपत्रक**

महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा - २०१९ करीता पदांचे पसंतीक्रम अथवा भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प सादर करण्याकरीता वेबलिंक उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तथापि, सदर वेबलिंकद्वारे पदांचे पसंतीक्रम सादर करताना तसेच भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प सादर करत असताना उमेदवारांमध्ये संभ्रम असल्याचे दिसून येत आहे. यास्तव, सदर वेबलिंकच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे:-

(१) वेबलिंकद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सर्व ८ पदांकरीता उमेदवाराने १ ते ८ मधील पसंतीक्रम अथवा 'No Preference' विकल्प निवडणे अनिवार्य आहे.

(२) अधिसूचित सर्व पदांकरीता १ ते ८ मधील पसंतीक्रम निवडणाऱ्या उमेदवारांचा त्यांनी दिलेल्या पसंतीक्रमानुसार सर्व पदांवरील निवडीकरीता विचार होईल.

(३) अधिसूचित ८ पदांपैकी ज्या पदांवरील निवडीकरीता इच्छुक आहे; केवळ त्याच पदाकरीता पसंतीक्रम सादर करावेत. ज्या पदांवरील निवडीकरीता इच्छुक नाही; त्या पदांकरीता 'No Preference' हा विकल्प निवडावा.

(४) कोणत्याही पदावरील निवडीकरीता इच्छुक नसणाऱ्या उमेदवारांनी 'Opting Out of all Preferences' या स्वतंत्र बटनद्वारे त्यांचा विकल्प सादर करावा; असा विकल्प देणाऱ्या उमेदवारांचा कोणत्याही पदावरील निवडीकरीता विचार करण्यात येणार नाही.

(५) पदांचे पसंतीक्रम अथवा भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प सादर केल्यानंतर 'Download PDF' हा पर्याय निवडून उमेदवारास सादर केलेले पसंतीक्रम जतन करुन ठेवता येऊ शकतील.

२. पदांचे पसंतीक्रम/ बाहेर पडण्याचा विकल्प सादर करण्यात कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी उद्भवल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ईमेल आयडीवर विहित कालावधीत संपर्क साधता येईल.

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग